## निवडक

### सातेरी देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त २० रोजी विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १५ :** मोरजी येथील पडते समाज श्री सातेरी देवस्थानचा वर्धापनदिन रविवार दि. २० रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

त्यानिमित्त सकाळी १० वाजता महापूजा, लघुरुद्र,नंतर दुपारी ओटी भरण्याचा कार्यक्रम दुपारी महाआरती व त्यानंतर होईल. दुपारी २ ते ३ या वेळेत महाप्रसाद होईल. संध्याकाळी ७ वाजता 'भक्तीरंग' हा भजनाचा कार्यक्रम होईल, त्यानंतर ९ वाजता स्थानिकातर्फे भजनाचा कार्यक्रम होईल. रात्री ११ वाजता श्रींची पालखी मिरवणूक होईल.

---

### मांगिरिष हायस्कूलचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १५ :** आरोबा येथील मांगिरिष हायस्कूलचा दहावीचा निकाल आठव्या वर्षी १०० टक्के लागला. २०२४-२५ या वर्षी १२ मुले दहावीच्या परीक्षेत बसली होती. यात एकूण ३ मुले विशेष श्रेणी तर ७ मुले प्रथम श्रेणी व २ मुले दृतिया श्रेणी उत्तीर्ण झाली. शाळेत प्रथम वैष्णवी चीक हिने ७८ टक्के मिळवून फटकवला, तर द्वितीय आयुष राऊत ह्याने ७६ टक्के मिळवले व तृतीय विदिशा खोर्जुवेकर हिने ७५ टक्के मिळवले. वरील विद्यार्थीच्या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, मुख्याध्यापिका, पालक शिक्षक संघ, शाळेचे शिक्षक वर्ग यांनी या यशवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत आहेत.

---

### धारगळ गाववाडा येथे २२ रोजी 'ती फुलराणी'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १५ :** धारगळ गाववाडा येथे मंगळवार दि. २२ रोजी 'ती फुलराणी' नाट्य प्रयोग सादर केला जाईल. धारगळ येथील श्री धारेश्वर माऊली संस्थान मूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त दि. २२ रोजी रात्री ८ वाजता रवळनाथ रंगमंच, धारगळ येथे अभिजीत स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब धारगळतर्फे 'ती फुलराणी' हा दोन अंकी सामाजिक नाट्य प्रयोग सादर केला जाईल.

या नाटकाचे रूपांतरित लेखक पु. ल. देशपांडे, निर्माता प्रकाश प्रभू देसाई, दिग्ददर्शक काका प्रभू देसाई , नेपथ्य संजय महामल , प्रकाश योजना विकास कांदोळकर आणि ध्वनी संकलन सर्वेश फुलारी, संगीत निलेश नाईक, रंगभूषा सागर हळदणकर, वेशभूषा महेश चुरी, व्यवस्थापक अभिजीत स्पोर्ट अँड कल्चरल क्लब. ती फुलराणी या नाटकांत धारगळ येथील उत्कृष्ट कलाकारांनी भाग घेतलेला आहे. यात उत्कृष्ट अशी भूमिका सादर करणारे दीपक देवस्थळी, त्याचबरोबर अनय तुयेकर, सुदेश प्रभू देसाई संजय धारगळकर, अंकित मोरजकर, निर्मिती नाईक, पूजा पंडित, गौतम राऊळ, ऋषिकेश प्रभुदेसाई, प्रकाश मोरगावकर, विनायक बांदोडकर, महेश चुरी, आकाश गावकर, ओंकार प्रभू देसाई व मंजुळाच्या भूमिकेत उमा प्रभुदेसाई यांची प्रमुख भूमिका आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहाने अभिजीत स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे 'ती फुलराणी' हा नाट्य प्रयोग बरोबर ८ वाजता साजरा केला जाईल. अभिजीत स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब दरवर्षी विविध नाटके साजरी करत असतात आणि त्यांच्या प्रयोगाला संपूर्ण पेडणे तालुक्यातून प्रेक्षक वर्ग येत असतात.

# भारताच्या बांगलादेश दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर

## ३ एकदिवसीय आणि ३ टी-२० सामने खेळवले जातील : मालिका १७ ऑगस्टपासून

**मुंबई, दि. १५ :**



भारतीय संघ या वर्षी ऑगस्टमध्ये बांगलादेशचा दौरा करणार आहे. या दौऱ्यात, यजमान बांगलादेश टीम इंडियासोबत ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळेल. ते १७ ऑगस्टपासून सुरू होईल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मंगळवारी, १५ एप्रिल रोजी आपले वेळापत्रक जाहीर केले.

या मालिकेतील पहिला सामना १७ ऑगस्ट रोजी मीरपूर येथे खेळला जाईल. यानंतर, दुसरा एकदिवसीय सामना २० ऑगस्ट रोजी मीरपूर येथे खेळला जाईल. त्यानंतर मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना २३ ऑगस्ट रोजी चितगाव येथे खेळला जाईल. एकदिवसीय मालिकेनंतर, ३ सामन्यांची टी-२० मालिका देखील खेळवली जाईल. टी-२० मालिका २६ ऑगस्ट रोजी चितगावमध्येच सुरू होईल.

भारत आणि बांगलादेश यांच्यात आतापर्यंत एकूण ५ एकदिवसीय मालिका खेळल्या गेल्या आहेत. या सर्व मालिका फक्त बांगलादेशमध्ये खेळल्या गेल्या आहेत. यापैकी भारताने ३ मालिका जिंकल्या आणि बांगलादेशने २ मालिका जिंकल्या. बांगलादेशने गेल्या दोन्ही मालिका जिंकल्या आहेत. भारतीय संघाने शेवटची एकदिवसीय मालिका २०१४ मध्ये जिंकली होती. त्याच वेळी, दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत २ टी-२० मालिका खेळल्या गेल्या आहेत. हे दोन्ही भारताने जिंकले आहेत.

सध्या खेळाडू आयपीएलमध्ये व्यस्त आहेत. आयपीएल २५ मे रोजी संपेल. यानंतर, टीम इंडियाला २० जूनपासून इंग्लंडमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे. ही मालिका ४ ऑगस्टपर्यंत चालेल. हे ५ सामने लीड्स, बर्मिंगहॅम, लॉर्ड्स, मँचेस्टर आणि द ओव्हलच्या मैदानावर खेळवले जातील.

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने (इसीबी) या महिन्यात पतौडी ट्रॉफी निवृत्त करण्याची घोषणा केली. भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेला पतौडी ट्रॉफी म्हणतात. हे २००७ मध्ये याची सुरुवात करण्यात आली होती, परंतु २०२५ मध्ये या ट्रॉफीचे नाव बदलले जाईल. नवीन नाव काय असेल हे अद्याप निश्चित झालेले नाही.

# सरस्वती ज्ञान प्रसारक संस्थेत उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड




**सावईवेरे, दि. १५ :** कवळे येथील श्री सरस्वती ज्ञान प्रसारक संस्थेच्या श्री सरस्वती पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातर्फे ४ ते ८ वयोगटातील मुलांसाठी आयोजित केलेल्या दहा दिवसीय उन्हाळी शिबिराचे उद्घाटन श्री सरस्वती हायस्कूलच्या सभागृहात थाटात झाले.

या उद्घाटन सोहळ्यास विद्यालयाच्या व्यवस्थापिका विद्या रामनाथकर, मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर, हायस्कूलच्या संगीत शिक्षिका आरती गावणेकर, प्राथमिक शिक्षिका शुक्ला नाईक, प्रतिभा पेडणेकर, पूर्व प्राथमिक शिक्षिका साक्षी नाईक, पूजाली रामनाथकर, कृतिका शेट उपस्थित होत्या.

सर्वप्रथम शिक्षक गीतेश वेरेकर यांनी स्वागत केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सदर शिबिर २५ एप्रिलपर्यंत चालणार असून या शिबिरात संगीत, कथाकथन, गाणी, खेळ, क्राफ्ट, चित्रकला, योगा शुद्धलेखनाचे नियम, घोषणा इत्यादी उपक्रम घेण्यात येतील.

# श्रेयस अय्यर ठरला 'प्लेयर ऑफ द मंथ'

**मुंबई, दि. १५ :**



भारतीय फलंदाज श्रेयस अय्यरला आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार मिळाला आहे. त्याने न्यूझीलंडच्या जेकब डफी आणि रचिन रवींद्र यांना मागे टाकत हा पुरस्कार जिंकला. तर, श्रेयसने दुसऱ्यांदा हा पुरस्कार जिंकला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये, त्याने फेब्रुवारीमध्ये ते जिंकले होते.

भारताने सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार जिंकला आहे. फेब्रुवारीच्या सुरुवातीला शुभमन गिलची महिन्यातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड झाली होती. भारताच्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजयात श्रेयसने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

श्रेयसने मार्च महिन्यात एकूण ३ एकदिवसीय सामने खेळले आणि ५७.३३ च्या सरासरीने १७२ धावा केल्या. या काळात, त्याने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या ग्रुप अ च्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ७९ धावा, उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४५ धावा आणि अंतिम फेरीत न्यूझीलंडविरुद्ध ४८ धावा केल्या, ज्यामुळे भारत विजेता बनला.

तो शानदार फलंदाजी करत चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. फेब्रुवारी-मार्चमध्ये खेळल्या गेलेल्या स्पर्धेत त्याने ५ सामन्यात २४३ धावा केल्या. यामध्ये पाकिस्तानविरुद्ध ५६ धावांचे आणि न्यूझीलंडविरुद्ध ७९ धावांचे अर्धशतक समाविष्ट आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात श्रेयसने अक्षर पटेलसोबत चौथ्या विकेटसाठी ६१ धावांची भागीदारी केली. त्याने ४८ धावांची खेळी खेळली. भारताने हा सामना ४ विकेट्सने जिंकला. रोहित शर्माने अंतिम सामन्यात ७६ धावा केल्या आणि त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.





Terms and conditions apply. #The Instant Cashback offer of ₹5100 is available on purchase of Shine100. #The offer may be modified or withdrawn at any time without prior intimation. #The scheme is offered by Authorized Main Dealers and Associate Dealers and can be availed on purchase of Shine100 from Authorized Main Dealers and Associate Dealers. *Approval of the loan is at the sole discretion of the financiers, and additional documentation may be required. *The interest rates, down payment, and tenure options are based on the financier's assessment of the applicant's credit profile. Nil Extra charges ( 0/- processing fee, 0/- Documentation Charge & 0/- Advance EMI) are applicable on Shine 100 model only. *The offers/features may be modified or withdrawn at any time without prior intimation. Additional Cashback offer is available on selected Honda2wheelers models for EMI transactions made using IDFC FIRST Bank credit cards and HDFC bank credit cards through Pine Labs machines only. Customers can avail 5% cashback, up to a maximum of ₹5000/-. Valid on one transaction per card/order during the offer period. The scheme is available at selected outlets only. The offers/features may be modified or withdrawn at any time without prior intimation. All offers are valid until 30th April 2025. The features shown in the creative may not be available in all variants. Product shown in the picture may vary from actual product available in the market. Accessories shown in the picture are not part of standard equipment.

**Honda Motorcycle & Scooter India Pvt. Ltd., Registered Office:** Plot No. 1, Sector - 03, IMT Manesar, Distt. Gurugram, (Haryana) - 122050, India; **Website:** www.honda2wheelersindia.com; **Customer Care:** customercare@honda.hmsi.in

**Honda Exclusive Authorized Dealerships: MAPUSA:** Counto Honda - 7447799507, 9850266777, 9175093474; **BICHOLIM:** Counto Honda - 8806667848; **MARGAO:** Goa Rajee Honda - 0832-2791751-55, 9552988811; **PANJIM:** Priority Honda - 0832-2233551, 8888885157; **MARCELA:** Priority Honda - 08322288944, 7719917776; **PONDA:** Goa Rajee Honda - 9552988822; **VASCO:** Goa Rajee Honda - 9552988833; **XELDEM:** Goa Rajee Honda - 9552988844; **CANACONA:** Goa Rajee Honda - 9881060727.

**For Bulk/Institutional enquiries, please write us at: institutionalsales@honda.hmsi.in**


RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 223 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .